महाराष्ट्र शासनाच्या यादीवरील अंक...
साप्ताहिक
RNI : MAH/MAR/2011/40762
पोस्टल नंबर : MCW/354/2021-23

# धगधगती मुंबई

website:www.dhagdhagtimumbai.in
E-mail : dhagdhagtimumbai@gmail.com

वर्ष : १६ अंक : २७, संपादक - भिमराव हिंदुराव धुळप मंगळवार, दिनांक १८ ऑगस्ट २०२६ ते २४ ऑगस्ट २०२६ पाने : ४ मूल्य : २ रुपये

## गणेशभक्त यंदाही रखडणार ? मुंबई-गोवा महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात असल्याचा दावा

**रत्नागिरी (विष्णू लिंगायत):** गणेशोत्सवासाठी कोकणाकडे जाणाऱ्या लाखो गणेशभक्तांचा प्रवास यंदा तरी सुखकर होणार का, असा सवाल मुंबई-गोवा महामार्गाच्या सद्य:स्थितीमुळे उपस्थित झाला आहे. महामार्गाचे काम अंतिम टप्प्यात असून रत्नागिरी ते पनवेल अंतर साडेचार तासांत पार करता येईल, असा विश्वास पालकमंत्री उदय सामंत यांनी व्यक्त केला आहे. मात्र गेल्या १८ वर्षांपासून सुरू असलेल्या चौपदरीकरणाच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाच्या दाव्यांवर प्रवाशांकडूनच प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.

रायगड जिल्ह्यातील वडखळ सर्व्हिस रोडची दयनीय अवस्था, खड्डे आणि निखळलेले पेव्हर ब्लॉक यामुळे अपघाताचा धोका वाढला आहे. मुंबईकडे जाणारा सर्व्हिस रोड बंद असल्याने एकाच मार्गावर दोन्ही बाजूंची वाहतूक सुरू आहे.



धोकादायक ओव्हरटेक, वाहतूक कोंडी आणि समोरासमोर धडक होण्याची शक्यता यामुळे वाहनचालक त्रस्त आहेत.

चिपळूणमधील बहादूर शेख चौक ते प्रांताधिकारी कार्यालय उड्डाणपुलाचे कामही अद्याप अपूर्ण आहे. स्लॅबचे काम सुरू असले तरी मोठ्या प्रमाणात मातीचा भराव, अंतिम काँक्रीट कोट आणि त्यानंतरची कामे बाकी आहेत. त्यामुळे गणेशोत्सवापूर्वी हा पूल वाहतुकीस खुला होण्याबाबत साशंकता आहे.

आरवली-संगमेश्वर ते लांजा दरम्यानही काही उड्डाणपूल व जोडरस्त्यांची कामे अपूर्ण आहेत. दरवर्षी गणेशोत्सवापूर्वी पाहणी दौरे आणि डेडलाइन जाहीर होतात; मात्र प्रत्यक्षात कामे पूर्ण होण्यास विलंब होतो.

१८ वर्षांची प्रतीक्षा यंदा संपणार की गणेशभक्तांना पुन्हा खड्डे, कोंडी आणि रखडलेल्या कामांचा सामना करावा लागणार? याचे उत्तर गणेशोत्सवापूर्वी प्रशासनाच्या कामाच्या वेगातूनच मिळणार आहे.

## धगधगती मुंबईतर्फे दहीकाला उत्सवात 'एक हंडी दिव्यांगांसाठी'
## गोविंदा पथकांवर बक्षिसांची लयलूट

**मुंबई :** धगधगती मुंबई वृत्तपत्र परिवारातर्फे सालाबादप्रमाणे यंदाही दहीकाला उत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) माहीम विधानसभा यांच्या सहकार्याने हा उत्सव सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रमांसह साजरा करण्यात येणार आहे.

धगधगती मुंबईच्या वतीने दरवर्षी दहीकाला उत्सवाच्या माध्यमातून सामाजिक आणि शैक्षणिक उपक्रम राबविले जातात. महागाईसह विविध जनसामान्यांच्या प्रश्नांवर जनजागृती करण्याबरोबरच अनाथाश्रम, वृद्धाश्रम, कॅन्सरग्रस्त रुग्णांना मदत तसेच रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांच्या नातेवाईकांना अन्नदान असे उपक्रम यापूर्वी राबविण्यात आले आहेत.

यंदाच्या दहीकाला उत्सवाचे विशेष आकर्षण म्हणजे 'एक हंडी दिव्यांगांसाठी' हा सामाजिक उपक्रम आहे. दिव्यांग बांधवांना कोणत्याही प्रकारचा त्रास होऊ नये, याची विशेष काळजी घेऊन त्यांच्या शाळेत जाऊनच दहीकाला उत्सवाच्या पूर्वसंध्येला हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. यावेळी दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र सन्मानचिन्ह आणि रोख पारितोषिक देऊन त्यांचा गौरव करण्यात येणार आहे.

तसेच दहीकाला उत्सवाच्या दिवशी सहभागी होणाऱ्या गोविंदा पथकांसाठी रोख रक्कम, सन्मानचिन्ह आणि विविध बक्षिसांची लयलूट करण्यात येणार आहे. एकूण २ लाख ५१ हजार रुपयांची बक्षिसे यावेळी देण्यात येणार असून, विविध प्रकारच्या स्पर्धात्मक बक्षिसांचा समावेश आहे. हा दहीकाला उत्सव शनिवार, ५ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ११ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत केशव दाते उद्यान, डॉ. आगाशे पथ, भवानी शंकर रोड, दादर पश्चिम येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाचे आयोजक धगधगती मुंबईचे संपादक व पत्रकार श्री. भीमराव बाळकाबाई हिंदुराव धुळप तसेच यशवंत विचले, माहीम विधानसभा निरीक्षक (शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गट) आहेत.

सामाजिक बांधिलकी, दिव्यांगांसाठी विशेष उपक्रम आणि गोविंदा पथकांना प्रोत्साहन देणारा यंदाचा दहीकाला उत्सव उत्साहात पार पडणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

## मौजे घोगाव येथे श्री बाळसिद्ध श्रावणी यात्रेचनिमित्त विविध धार्मिक कार्यांचे आयोजन

**कराड :** मौजे घोगाव, ता. कराड, जि. सातारा येथील श्री बाळसिद्ध मंदिरात यंदा श्री बाळसिद्ध श्रावणी यात्रेचे १९ वे वर्ष उत्साहात साजरे करण्यात येणार आहे. सन २००८ पासून सुरू असलेल्या या श्रावणी यात्रेनिमित्त श्रावण महिन्यात मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम, अभिषेक, आरती व तीर्थप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

यात्रेच्या निमित्ताने रविवार १६ ऑगस्ट २०२६ रोजी श्रावणी पहिला रविवार, रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी दुसरा रविवार, शुक्रवार २८ ऑगस्ट रोजी रक्षाबंधन पौर्णिमेनिमित्त महाप्रसाद, रविवार ३० ऑगस्ट रोजी तिसरा रविवार आणि रविवार ६ सप्टेंबर २०२६ रोजी चौथा रविवार अशा कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

श्रावणी यात्रेतील चारही रविवार तसेच पौर्णिमेच्या दिवशी पहाटे ५ वाजता श्री बाळसिद्ध माऊलींचा अभिषेक, सकाळी ६ वाजता पहिली आरती, सकाळी १० वाजता दुसरी आरती व त्यानंतर तीर्थप्रसादाचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच रात्री ८ वाजता आरती होणार आहे. अशा प्रकारे भाविकांना दिवसभर तीन वेळा आरतीचा लाभ घेता येणार



आहे. रक्षाबंधन पौर्णिमा, शुक्रवार २८ ऑगस्ट रोजी सकाळी १०.१५ ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. महाप्रसादासाठी देणगी अथवा धान्य देऊ इच्छिणाऱ्या भाविकांनी २३ ऑगस्ट २०२६ पर्यंत सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

श्री बाळसिद्ध माऊलींच्या दर्शनासाठी, आरतीसाठी व तीर्थप्रसादाचा लाभ घेण्यासाठी भाविक भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन समस्त ग्रामस्थ मंडळ, घोगाव, आटके, दुशेरे तसेच परगावचे पाहुणे यांच्या वतीने करण्यात आले आहे.




## स्वातंत्र्यदिनी धारावीकरांचा तिरंगा एल्गार
## 500 चौ.फुटांची घरे धारावीतच देण्याची मागणी

**मुंबई :** धारावीतील सर्व रहिवाशांचे धारावीतच पुनर्वसन करावे आणि पात्र-अपात्र असा भेद न करता प्रत्येकाला किमान ५०० चौ.फुटांची घरे व दुकाने द्यावीत, या मागणीसाठी स्वातंत्र्यदिनी हजारो धारावीकर रस्त्यावर उतरले. धारावी बचाव आंदोलनाच्या वतीने सायंकाळी 'धारावी बचाव तिरंगा रॅली' काढण्यात आली.

भारत माता की जय, वंदे मातरम्, 'घर के बदले घर, दुकान के बदले दुकान', 'धारावीच्या बाहेर जाणार नाही' अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. संविधान चौक, मुकुंद नगर, सायन-बांद्रा



लिंक रोड, धारावी मेन रोड, कोळीवाडा, पोस्ट ऑफिस, चामडा बाजार, मोठी मशीद, क्रॉस रोड मार्गे रॅलीचा समारोप शिवनारायण बावडीजवळ झाला. पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता.

सर्व धारावीकरांना धारावीतच घरे-दुकाने द्यावीत, एसआरएच्या नोटिसांद्वारे दबाव टाकणे थांबवावे, व्यावसायिकांना गोदामांच्या बदल्यात गोदामे द्यावीत आणि कुंभारवाडा व कोळीवाड्यांच्या पारंपरिक व्यवसायांचे संरक्षण करावे, अशा प्रमुख मागण्या करण्यात आल्या.

माजी आमदार बाबुराव माने, कॉम्रेड राजू कोरडे, कॉम्रेड नसीरूल हक, उल्लेश गजाकोश, पॉल राफेल, अनिल कसारे आदींच्या नेतृत्वाखाली ही रॅली झाली. राष्ट्रगीताने रॅलीची सांगता झाली.

माजी आमदार बाबुराव माने यांनी पात्र-अपात्रचा भेद बंद करून सरकारने धारावीकरांना पुनर्वसनाचे लेखी आश्वासन द्यावे, अशी मागणी केली.

## संपादकीय

# श्रावण : भक्ती, निसर्ग आणि नात्यांना जोडणारा सणांचा महिना

श्रावण महिना सुरू झाला की वातावरणातच एक वेगळे चैतन्य निर्माण होते. आकाशात दाटलेले काळे ढग, रिमझिम पाऊस, हिरवाईने नटलेली धरती आणि मंदिरांमधून ऐकू येणारा हर हर महादेवचा जयघोष... या साऱ्या वातावरणामुळे श्रावणाची चाहूल मनाला प्रसन्न करून जाते. हिंदू संस्कृतीत श्रावण महिन्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हा महिना केवळ धार्मिक श्रद्धेचा नाही, तर निसर्ग, परंपरा, कुटुंब आणि सामाजिक एकोप्याचा सुंदर संगम घडवून आणणारा काळ आहे. म्हणूनच श्रावणाला 'सणांचा महिना' आणि 'व्रतवैकल्यांचा महिना' म्हटले जाते.

श्रावणातील सोमवार विशेष पवित्र मानला जातो. या दिवशी भगवान शिवाची भक्तिभावाने पूजा, अभिषेक आणि उपवास केला जातो. अनेक भाविक मंदिरांमध्ये जाऊन दर्शन घेतात. मात्र श्रावणाचे महत्त्व केवळ सोमवारपुरते मर्यादित नाही. नागपंचमी, मंगळागौर, रक्षाबंधन, नारळी पौर्णिमा, श्रीकृष्ण जन्माष्टमी, गोपाळकाला आणि बैलपोळा अशा विविध सण-उत्सवांनी हा महिना अक्षरशः बहरून जातो. पुढे येणाऱ्या गौरी-गणपतीच्या उत्सवाची चाहूलही श्रावणापासूनच लागते.

सणांच्या निमित्ताने घराघरांत उत्साहाचे वातावरण निर्माण होते. गोडाधोडाचा बेत, पूजा-अर्चा, नातेवाईकांच्या भेटीगाठी आणि पारंपरिक कार्यक्रम यामुळे कुटुंबातील सदस्य एकत्र येतात. आजच्या धावपळीच्या जीवनात कमी होत चाललेला प्रत्यक्ष संवाद अशा प्रसंगी पुन्हा जिवंत होतो. मंगळागौरसारख्या परंपरांमधून महिलांना एकत्र येण्याची, आनंद व्यक्त करण्याची आणि मैत्रीचे बंध अधिक घट्ट करण्याची संधी मिळते.

श्रावणातील व्रतवैकल्यांमध्ये श्रद्धेबरोबरच संयम आणि मानसिक शिस्तीचाही संदेश दडलेला आहे. उपवास असो किंवा एखादे व्रत, त्यामागील सकारात्मक विचार जीवनाला दिशा देऊ शकतो. सुख-दुःखाच्या प्रसंगांत श्रद्धा, आत्मविश्वास आणि संयम माणसाला मानसिक आधार देतात. मात्र श्रद्धा जपत असताना अंधश्रद्धेला थारा न देणे, हीदेखील काळाची गरज आहे.

श्रावणाचे आणखी एक मोठे वैशिष्ट्य म्हणजे निसर्ग. आषाढातील पावसाने धरती हिरवाईने नटलेली असते. डोंगर-दऱ्या, शेतांच्या बांधांवरील गवत, झाडे-वेली आणि माळरानावर पसरलेली हिरवाई मन मोहून टाकते. क्षणात पाऊस, क्षणात ऊन आणि पुन्हा हिरवाईवर बरसणाऱ्या सरी असा श्रावणातील निसर्गाचा लहरी स्वभाव प्रत्येकाला आनंद देतो. म्हणूनच बालकवींच्या 'श्रावणमासी हर्ष मानसी, हिरवळ दाटे चोहिकडे' या ओळी श्रावणाचे सुंदर चित्र डोळ्यांसमोर उभे करतात.

श्रावण हा सामाजिक सलोखा वाढविण्याची संधीही देतो. विविध समाजघटकांचे सण-उत्सव या कालखंडात येतात. परंपरांचा सन्मान राखत एकमेकांच्या आनंदात सहभागी होणे, बंधुभाव वाढविणे आणि सामाजिक एकोपा जपणे, ही आपल्या संस्कृतीची खरी ताकद आहे.

आज तंत्रज्ञानामुळे माणूस जगाशी जोडला गेला असला तरी निसर्ग आणि माणसामाणसांमधील प्रत्यक्ष संवाद काहीसा कमी झाला आहे. अशा वेळी श्रावण आपल्याला पुन्हा निसर्गाशी, परंपरांशी आणि नात्यांशी जोडतो. त्यामुळे सण साजरे करताना पर्यावरणाची काळजी घेणे, अनावश्यक खर्च टाळणे आणि सर्वांना सोबत घेऊन आनंद वाटणे आवश्यक आहे.श्रावण म्हणजे केवळ भक्ती नव्हे; तो संयम आणि सकारात्मकतेचा संदेश आहे. श्रावण म्हणजे केवळ हिरवाई नव्हे; तो निसर्गाशी असलेल्या आपल्या नात्याची जाणीव आहे. श्रावण म्हणजे केवळ सण नव्हे; तो नात्यांमध्ये स्नेह वाढविणारा आनंदोत्सव आहे.

निसर्गाच्या सान्निध्यात, परंपरांच्या सुगंधात आणि सणांच्या आनंदात मन चिंब भिजविणारा हा श्रावण प्रत्येकाच्या जीवनात सुख, समाधान, आरोग्य आणि आनंद घेऊन येवो, हीच सदिच्छा!

# सलग चार वर्षे शाळेसाठी भरीव योगदान;
# अरविंद संपत खोत सहपरिवार यांचा सत्कार

विठोबाचीवाडी : जिल्हा परिषद शाळा विठोबाचीवाडीच्या शैक्षणिक व भौतिक विकासासाठी श्री. अरविंद संपत खोत सहपरिवार यांनी सलग चार वर्षे विविध स्वरूपात आर्थिक व साहित्यिक स्वरूपाचे भरीव सहकार्य केले आहे. त्यांच्या या सातत्यपूर्ण योगदानाबद्दल शाळेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

श्री. खोत यांनी २०२३-२४ मध्ये विद्यार्थ्यांसाठी पेरू वृक्ष वाटपासाठी ₹४,५००, २०२४-२५ मध्ये डिजिटल पाट्या वाटपासाठी ₹५,०००, २०२५-२६ मध्ये लोजिम व ढोल साहित्याकरिता ₹६,०००, तर २०२६-२७ मध्ये शाळेच्या लॉनच्या विकासासाठी ₹१५,००० असे योगदान दिले. अशा प्रकारे चार वर्षांत त्यांनी एकूण ₹३०,५०० रुपयांचे विशेष सहकार्य केले आहे.

विद्यार्थ्यांना आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध व्हाव्यात, त्यांच्या कलागुणांना व क्रीडा कौशल्याला प्रोत्साहन मिळावे तसेच शाळेचा परिसर हिरवाईने व सुंदर वातावरणाने नटावा, या उद्देशाने खोत कुटुंबीयांनी केलेले हे कार्य निश्चितच कौतुकास्पद व प्रेरणादायी आहे.

या उल्लेखनीय सामाजिक व शैक्षणिक योगदानाची दखल घेत जिल्हा परिषद शाळा विठोबाचीवाडीच्या वतीने अरविंद संपत खोत सहपरिवार यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शाळा व्यवस्थापन समिती, शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालकांच्या वतीने त्यांच्या सातत्यपूर्ण सहकार्याबद्दल मनःपूर्वक आभार व्यक्त करण्यात आले.

शाळेच्या विकासासाठी सलग चार वर्षे मदतीचा हात देणाऱ्या अरविंद संपत खोत सहपरिवार यांच्या उपक्रमातून समाजाने शाळांच्या विकासासाठी पुढाकार घेण्याची प्रेरणा मिळत आहे.

# शिवसमर्थ मल्टीस्टेटचा २० वा वर्धापन दिन उत्साहात संपन्न




तळमावले : शिवसमर्थ मल्टीस्टेट को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी लिमिटेडच्या मुख्य कार्यालय व तळमावले शाखेचा २० वा वर्धापन दिन सोहळा शनिवार, १५ ऑगस्ट रोजी विविध सामाजिक उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला.

वर्धापन दिनानिमित्त शिवसमर्थ भवन येथे श्री सत्यनारायण महापूजेचे आयोजन करण्यात आले. यावेळी सभासद, ठेवीदार, ग्राहक व हितचिंतक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

'बालाजी ब्लड सेंटर, सातारा' यांच्या सहकार्याने आयोजित भव्य रक्तदान शिबिराला नागरिक, तरुण आणि संस्थेच्या कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत रक्तदान केले. रक्तदात्यांचा सन्मानपत्र, सन्मानचिन्ह व भेटवस्तू देऊन गौरव करण्यात आला.

'शिव आरोग्य सेवा हॉस्पिटल, तळमावले' यांच्या माध्यमातून मोफत सर्वरोग आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. तज्ज्ञ डॉक्टरांनी शेकडो रुग्णांची तपासणी करून औषधोपचार व आरोग्यविषयक मार्गदर्शन केले.

१५ ऑगस्ट ते १५ सप्टेंबरदरम्यान मुदत ठेवींवर नियमित दरापेक्षा १ टक्का अतिरिक्त व्याजदर देण्यात येणार असल्याची माहिती संस्थेने दिली. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष ॲड. जनार्दन लक्ष्मण बोत्रे, सीईओ हेमंत तुपे यांच्या मार्गदर्शनाखाली संचालक, अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कार्यक्रमाचे नियोजन केले.

# 'वंदे मातरम्'च्या सन्मानासाठी भाजयुमोचे आंदोलन;
# मुंबईतील सहाही जिल्ह्यांत सामूहिक गायन

**मुंबई :** १५ ऑगस्ट रोजी झालेल्या ध्वजारोहण कार्यक्रमादरम्यान 'वंदे मातरम्' सुरू असताना काँग्रेस अध्यक्षा सोनिया गांधी आणि काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी राष्ट्रगीताच्या सन्मानाला ठेच पोहोचविल्याचा आरोप करत भारतीय जनता युवा मोर्चा (भाजयुमो), मुंबईच्या वतीने रविवारी मुंबईतील सहाही जिल्ह्यांत तीव्र निषेध आंदोलन करण्यात आले.

हे आंदोलन भाजपा मुंबई अध्यक्ष व आमदार अमित साटम यांच्या मार्गदर्शनाखाली आणि भाजयुमो मुंबई अध्यक्ष दीपक सिंह यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले.

दादर पूर्व येथील श्री स्वामीनारायण मंदिरासमोरील भाजयुमोच्या कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने आंदोलन केले. यावेळी कार्यकर्त्यांनी सामूहिकरीत्या 'वंदे मातरम्'चे गायन करून राष्ट्रगीताच्या सन्मानाचे आणि राष्ट्रीय स्वाभिमानाचे रक्षण करण्याचा संकल्प केला. काँग्रेस नेत्यांच्या कथित अनादराच्या विरोधात लोकशाही मार्गाने निषेध नोंदविण्यात आला.

यावेळी भाजयुमो मुंबई अध्यक्ष दीपक सिंह म्हणाले, "मोदीविरोध करता करता काँग्रेस आता देशाच्या राष्ट्रीय प्रतीकांचाही विरोध करण्याच्या मानसिकतेत उतरली आहे. सोनिया गांधी आणि राहुल गांधी यांनी 'वंदे मातरम्'चा केलेला कथित अनादर हा कोट्यवधी भारतीयांच्या राष्ट्रीय भावनांचा अपमान आहे. या घटनेतून काँग्रेसचे खरे स्वरूप देशासमोर आले आहे."




ते पुढे म्हणाले, "'वंदे मातरम्'ने स्वातंत्र्यलढ्याच्या काळात लाखो स्वातंत्र्यसैनिकांच्या मनात राष्ट्रभक्तीची भावना जागृत केली. हे गीत गाताना अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी ब्रिटिश सत्तेचा लाठीमार आणि तुरुंगवास सहन केला; मात्र त्यांनी राष्ट्रभक्तीची भावना सोडली नाही. त्यामुळे राष्ट्राच्या गौरवाशी संबंधित प्रतीकांचा सन्मान राखणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे."

"राजकीय विरोधालाही एक मर्यादा असते. राजकीय स्वार्थासाठी राष्ट्रीय भावना आणि देशाच्या गौरवाशी खेळ करणे जनता कदापि स्वीकारणार नाही. 'वंदे मातरम्'च्या सन्मानासाठी भाजयुमो मुंबई सदैव ठामपणे उभे राहील," असेही सिंह यांनी सांगितले. या आंदोलनात भाजयुमो मुंबईचे पदाधिकारी, जिल्हाध्यक्ष, मंडल पदाधिकारी, युवा कार्यकर्ते तसेच मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाले होते.

# "बँगलोर येथील निखिल प्रॉडक्ट्स ची" संगीत सागर अगरबत्ती,
# कल्पवृक्ष अगरबत्ती आणि सिग्नेत्तर ऊद अगरबत्ती बाजारात !

मुंबई : निखिल प्रॉडक्ट्स बँगलोरच्या अगरबत्ती कंपनीने येणाऱ्या सण उत्सवासाठी श्रावण, गणपती, दसरा, दिवाळी या सगांचे औचित्य साधून संगीत सागर अगरबत्ती, कल्पवृक्ष अगरबत्ती आणि सिग्नेचर ऊद अगरबत्ती या तीन प्रकारच्या मसाला अगरबत्त्या बाजारामध्ये उपलब्ध केल्या आहेत. पूजा किंवा धार्मिक विधीमध्ये अगरबत्ती आणि धूपाला विशेष महत्त्व दिले गेले आहे. असे मानले जाते की देवाची पूजा करत असताना आपले तन संपूर्णपणे प्रार्थनेस विलिन व्हावे, यासाठी अगरबत्ती आणि धूपाच्या मनमोहक सुवासाची मदत होते. संगीत सागर अगरबत्ती आणि कल्पवृक्ष अगरबत्ती उच्च दर्जाचे नैसर्गिक सुगंधी द्रव्य आणि हलमडी पासून तयार केलेली असून, ही हँडमेड नॅचरल मसाला अगरबत्ती ५० ग्रॅम आकर्षक पॅकिंगमध्ये बाजारात उपलब्ध आहे. सिग्नेचर ऊद अगरबत्ती उच्च दर्जाच्या आसामच्या ऊद तेलापासून तयार केलेली आहे. ही हँडमेड अगरबत्ती ५० ग्रॅमच्या आकर्षक पॅकिंगमध्ये बाजारात उपलब्ध आहे. संगीत सागर अगरबत्ती, कल्पवृक्ष अगरबत्ती आणि सिग्नेचर ऊद अगरबत्ती मुंबई, ठाणे, कोकण, कोल्हापूर, पुणे, नाशिक, बीड सह संपूर्ण महाराष्ट्रात उपलब्ध आहेत निखिल प्रॉडक्ट्स च्या उत्पादनांचे मुंबईचे प्रमुख विक्रेते आचार्य प्रॉडक्ट्स यांच्या शाखा : (१) शॉप नं.५-८, संगीत सागर, एल. एन. लेन, माटुंगा (पु.), मुंबई-१९. (सपर्क ८६५५७६६७७८) (२) शॉप नं. ३. श्रीपती आराधना टॉवर, राममंदिरच्या पुढे, भुलेश्वर, मुंबई-२. (संपर्क ९७६९०७८३६५) (३) शॉप नं.१९-ए, नटराज मार्केट, स्टेशन रोड, मालाड (प.), मुंबई-६४. (संपर्क ७५०६८१६२७२) (४) शॉप ३-४ हॉटेल प्रिन्स, अशोक टॉकीज शेजारी, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम)-४००६०१. (संपर्क ९१६७६५८७६८) (५) शॉप नं.१. मर्चेट सेंटर, ए.पी.एन.सी. मार्केट, सेक्टर १९, वाशी-४००७०३. (संपर्क ८८७९३७४५९२) यांच्याशी संपर्क साधावा.

# परिस्थितीवर मात करून ध्येय गाठा : डॉ. गोरखनाथ पोळ , नागेश्वर विद्यालयातील विद्यार्थ्यांना प्रेरणादायी मार्गदर्शन

आंबवडे, ता. भोर : स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचलित श्री नागेश्वर विद्यालय, आंबवडे येथे विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी मार्गदर्शन कार्यक्रम आयोजित करण्यात आला. यावेळी डॉ. गोरखनाथ पोळ यांनी विद्यार्थ्यांशी शिक्षण, संस्कार, ध्येय निश्चिती, आत्मविश्वास आणि करिअरच्या संधींबाबत संवाद साधला.

“परिस्थिती कितीही प्रतिकूल असली तरी हार मानू नका. जिद्द, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर आपले ध्येय निश्चित करून ते साध्य करा,” असे आवाहन डॉ. पोळ यांनी केले. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये मोठी क्षमता असून, योग्य दिशा आणि सातत्यपूर्ण प्रयत्नांतून ते कोणत्याही क्षेत्रात यश मिळवू शकतात, असे त्यांनी सांगितले.

आपल्या जीवनप्रवासातील अनुभव सांगताना डॉ. पोळ यांनी पुस्तके विकण्यापासून ते जीवनदीप प्रकाशनमध्ये मार्केटिंग मॅनेजर म्हणून केलेल्या कामापर्यंतचा प्रवास विद्यार्थ्यांसमोर मांडला. परिस्थितीपेक्षा जिद्द आणि शिकण्याची तयारी महत्त्वाची असल्याचा संदेश त्यांनी दिला.

विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी पाठ्यपुस्तके, संदर्भ पुस्तके किंवा आवश्यक शैक्षणिक साहित्याची गरज भासल्यास विद्यालयाच्या माध्यमातून शक्य ती मदत करण्याचे आश्वासन त्यांनी दिले. यावेळी गारमेंट व्यावसायिक संदीप पोळ यांनी विद्यालयासाठी आवश्यक कापड देण्याचे जाहीर केले.

कार्यक्रमास मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांनी मोठी स्वप्ने पाहून आई-वडील, गाव आणि विद्यालयाचे नाव उज्ज्वल करावे, असा संदेश यावेळी देण्यात आला.

## संत कृष्णदास महाराजांचा ३२ वा समाधी सोहळा भक्तिमय वातावरणात उत्साहात संपन्न



**जुन्नर :** जुन्नर तालुक्यातील घोडेगाव येथील तळेकरवाडी येथे संत कृष्णदास महाराज यांच्या ३२ व्या समाधी सोहळ्याचे नुकतेच भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले. मुंबईतील रहिवासी व सत्संग परिवाराशी जोडलेले संत कृष्णदास महाराज यांनी शुक्ल पक्षातील नागपंचमीच्या दिवशी ‘राम कृष्ण हरी’ असा तीन वेळा उच्चार करून समाधी घेतली होती. या घटनेला यंदा ३२ वर्षे पूर्ण झाली.

या समाधी सोहळ्यासाठी मुंबईतील सत्संग परिवारासह घोडेगाव व परिसरातील विविध गावांमधील भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. विशेषतः दादर येथील फूल मार्केटमधील व्यापारी वर्गातील महिला व पुरुष भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून महाराजांचे दर्शन घेतले.

यावेळी ह.भ.प. पांडुरंग चौगले महाराज (भाऊ) यांचे समाजप्रबोधनपर प्रवचन झाले. त्यांच्या प्रवचनाला उपस्थित भाविकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. भजन, गायन आणि नामस्मरणामुळे संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारून गेला होता.

श्रावणी सोमवार आणि नागपंचमी या दोन्ही पर्वांचा संगम साधत भाविकांसाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये साबुदाणा खिचडी, राजगिरा लाडू आणि केळी असा प्रसाद ठेवण्यात आला होता.

संत कृष्णदास महाराज यांनी ज्या घरी वास्तव्य केले होते, त्या ठिकाणीही दर्शनासाठी भाविकांची मोठी रांग लागली होती. भक्तांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे संपूर्ण समाधी सोहळा अत्यंत श्रद्धा, भक्ती आणि उत्साहाच्या वातावरणात पार पडला.

## रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा तिढा सुटला; अखेर 2 जणांची नावं जाहीर

**मुंबई :** गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेल्या रायगड) आणि नाशिक पालकमंत्रिपदाचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्र्यांची नावं आज शासनाकडून जाहीर करण्यात आली आली आहेत. नाशिकमध्ये गिरीश महाजन, तर रायगडमध्ये भरत गोगावले यांची पालकमंत्री म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.

महायुतीमधील तीनही पक्षांचे स्थानिक नेते आपापल्या जिल्ह्यांत आपले वर्चस्व राहावे आणि निधीचे नियंत्रण मिळावे यासाठी आक्रमक होते. यामुळे नाशिक आणि रायगडच्या पालकमंत्रिपदाच्या नियुक्त्यांवर स्थगिती देण्यात आली होती. मात्र आज अखेर रायगड आणि नाशिकच्या पालकमंत्रिपदाचा प्रश्न सुटला आहे. रायगडच्या पालकमंत्रिपदासाठी शिवसेना शिंदे गट आणि राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांच्यात रस्सीखेच सुरू होती. यात मंत्री आदिती तटकरे आणि भरत गोगावले दोघेही इच्छुक होते. अखेर ही जबाबदारी भरत गोगावले यांच्याकडे सोपवण्यात आली. तर नाशिकच्या पालकमंत्रिपदासाठी भाजप, शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस यांच्यात चुरस होती. परंतु अखेर नाशिकची धुरा गिरीश महाजन यांच्याकडे कायम ठेवण्यात आली आहे.



आरओसी-२०२६-२७/क्र-५/D२३१०

# आई-वडिलांच्या संस्कारांची जपणूक करत कर्तृत्व सिद्ध करा : मनोज सानप

## यशवंतराव चव्हाण पुरस्कार 2026 सोहळ्यात विविध क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव

**नवी मुंबई :** यशवंतराव चव्हाण फाउंडेशन व यशवंतनीती वृत्तपत्राच्या वतीने आयोजित यशवंतराव चव्हाण पुरस्कार २०२६ सोहळा नवी मुंबई स्पोर्ट्स क्लब येथे उत्साहात पार पडला. विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींचा या सोहळ्यात पुरस्कार देऊन गौरव करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ठाणे जिल्हा माहिती अधिकारी मनोज सुमन शिवाजी सानप होते. यावेळी युवा नेते,नगरसेवक अमित चौगुले, शिवसेना उपजिल्हाप्रमुख नवी मुंबई चंद्रकांत चाळके, यशवंतनीतीचे संस्थापक-अध्यक्ष व संपादक संजय सावंत, संघटक सुभाष बावडेकर, उद्योजक रामदास शिंगारे, पत्रकार भीमराव धुळप यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते. यावेळी आदर्श माता सन्मान पुरस्कार सौ. आनंदीबाई शिंगारे यांना प्रमुख मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. त्यानंतर महाराष्ट्रासह विविध राज्यांतून आलेल्या कर्तृत्ववान व्यक्तींना यशवंतराव चव्हाण पुरस्कार २०२६ देऊन सन्मानित करण्यात आले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना मनोज सानप म्हणाले की, "स्वातंत्र्य दिन साजरा करताना आपण खरोखरच भारतीय म्हणून आपले कर्तव्य पार पाडतो का, याचा प्रत्येकाने विचार करण्याची गरज आहे. आपण भारतीय असल्याचा अभिमान व्यक्त करतो; मात्र रस्त्यावर प्लास्टिक, गुटख्याच्या पुड्या आणि कचरा फेकताना आपण आपल्या देशाप्रती असलेले कर्तव्य विसरतो. देशप्रेम केवळ घोषणांमध्ये न राहता आपल्या कृतीतही दिसले पाहिजे."

आई-वडिलांच्या संस्कारांमुळे आपल्या आयुष्याला योग्य दिशा मिळते, असे सांगताना सानप यांनी आपल्या जीवनातील एक प्रसंगही उपस्थितांसमोर मांडला. ते म्हणाले, "एकेकाळी मी मुंबईत बिल्डर म्हणून काम करत होतो आणि १५ इमारती बांधल्या. मात्र एका प्रसंगानंतर माझ्या आई-वडिलांनी मला एक विनंती केली. त्यांच्या शब्दांचा विचार करून मी एका रात्रीत बांधकाम व्यवसाय सोडण्याचा निर्णय घेतला. त्यावेळी ८९ लाख रुपयांचे नुकसान झाले; मात्र आई-वडिलांच्या डोळ्यांत आलेले आनंदाश्रू



माझ्यासाठी त्या ८९ लाखांपेक्षा कितीतरी मोठे होते."

पदावर किंवा खुर्चीवर बसताना आपली नियत स्वच्छ राहावी आणि आपल्या कृत्यांमुळे आई-वडील, पत्नी, मुले, मित्र आणि गुरुजनांची मान खाली जाऊ नये, अशी प्रार्थना आपण करतो, असेही त्यांनी सांगितले. पुरस्कारांच्या वाढत्या व्यावसायिकीकरणावर भाष्य करताना सानप म्हणाले की, "आज पुरस्कारांबाबत अनेकदा प्रश्न उपस्थित केले जातात. मात्र या सोहळ्यात पुरस्कार मिळविणाऱ्या प्रत्येक व्यक्तीचे कर्तृत्व आणि चेहऱ्यावरचा आत्मविश्वास पाहता हा सन्मान त्यांच्या कार्याची दखल घेऊनच केला गेला आहे, असा माझा विश्वास आहे."

आई-वडिलांच्या कष्टांची जाणीव ठेवणे आणि समाजाला काहीतरी देण्याची वृत्ती जोपासणे गरजेचे आहे, असे सांगून त्यांनी तरुणांना आवाहन केले. "व्यक्ती श्रीमंत असली तरी तिच्याकडे देण्याची क्षमता नसेल तर त्या संपत्तीचा उपयोग नाही. एखाद्याकडे काहीच नसले तरी इतरांसाठी काही करण्याची भावना मोठी असू शकते. त्यामुळे तरुणांनी आपल्या आई-वडिलांना आपले मूळ मानून त्यांचा आदर करावा आणि समाजासाठी सकारात्मक काम करण्याचा प्रयत्न करावा," असे सानप म्हणाले.

यावेळी अमित चौगुले यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करत आपले मनोगत व्यक्त केले. यशवंतराव चव्हाण यांच्या विचारांचा आदर्श समोर ठेवून सामाजिक बांधिलकी जपणाऱ्या व्यक्तींचा सन्मान करण्याचा हा उपक्रम कौतुकास्पद असल्याचे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात विविध क्षेत्रांतील पुरस्कारार्थी, मान्यवर, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## बँगलोर येथील "निखिल प्रॉडक्ट्स" चे रातराणी (नाईट क्वीन) आणि फिरदौस धूप बाजारात !

**मुंबई :** निखिल प्रॉडक्ट्स बैंगलोरच्या कंपनीने येणाऱ्या सण उत्सवासाठी श्रावण, गणपती, दसरा, दिवाळी या सणांचे औचित्य साधून रातराणी (नाईट क्वीन) आणि फिरदौस धूप बाजारामध्ये उपलब्ध केले आहेत. पूजा किंवा धार्मिक विधीमध्ये धूपाला विशेष महत्त्व दिले गेले आहे. असे मानले जाते की देवाची पूजा करत असताना आपले मन संपूर्णपणे प्रार्थनेत विलिन व्हावे, यासाठी धूपाच्या मनमोहक सुवासाची मदत होते. रातराणी (नाईट क्वीन) आणि फिरदौस धूप हे धूप उच्च दर्जाच्या नैसर्गिक सुगंधी द्रव्यापासून तयार केले असून, १८ कांड्यांच्या पॅकिंगमध्ये आणि MRP १०५/- सह बाजारात उपलब्ध आहेत.

हे दोन्ही धूप मुंबई, ठाणे, कोकण, पुणे, नाशिक, कोल्हापूर, बीड सह संपूर्ण महाराष्ट्रात उपलब्ध आहेत. निखिल प्रॉडक्ट्स च्या उत्पादनांचे मुंबईचे प्रमुख विक्रेते आचार्य प्रॉडक्टस् यांच्या शाखा : (१) शॉप नं.५-८, संगीत सागर, एल. एन. लेन, माटुंगा (पु.), मुंबई-१९. (संपर्क ८६५५७६६७७८) (२) शॉप नं.३, श्रीपती आराधना टॉवर, राममंदिरच्या पुढे, भुलेश्वर, मुंबई-२. (संपर्क ९७६९०७८३६५) (३) शॉप नं.१९-ए, नटराज मार्केट, स्टेशन रोड, मालाड (प.), मुंबई-६४. (संपर्क ७५०६८१६२७२) (४) शॉप ३-४ हॉटेल प्रिन्स, अशोक टॉकीज शेजारी, स्टेशन रोड, ठाणे (पश्चिम) -४००६०१. (संपर्क ९९६७६५८७६८) (५) शॉप नं.१, मर्चंट सेंटर, ए.पी.एम.सी. मार्केट, सेक्टर १९, वाशी-४००७०३. (संपर्क ८८७९३७४५९२) यांच्याशी संपर्क साधावा.

## सूर्यकांत लाडे यांची राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या महाराष्ट्र उपाध्यक्षपदी नियुक्ती

**मुंबई :** राष्ट्रीय चर्मकार महासंघ महाराष्ट्रीय चर्मकार संघ (रजि. क्र. महा/४०४२) या अराजकीय सामाजिक संघटनेच्या महाराष्ट्र उपाध्यक्षपदी सूर्यकांत लाडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष तथा माजी समाजकल्याण मंत्री बबनराव घोलप यांच्या मार्गदर्शनाखाली आणि प्रदेशाध्यक्ष डॉ. शांताराम पां. कारंडे यांच्या हस्ते नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

समाजासाठी सातत्याने काम करण्याची तळमळ, समाजाविषयी



असलेली श्रद्धा आणि राष्ट्रीय चर्मकार महासंघाच्या ध्येयधोरणांशी असलेली बांधिलकी लक्षात घेऊन लाडे यांची अस्थायी स्वरूपात महाराष्ट्र उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. समाजातील सर्व घटकांना सोबत घेऊन, कोणतेही वाद-विवाद किंवा गटबाजी न करता समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी काम करावे, अशी अपेक्षा नियुक्तिपत्रातून व्यक्त करण्यात आली आहे.

सूर्यकांत लाडे हे शिवसेना अपंग सहाय्य सेनेचे अध्यक्ष असून पत्रकारांचे मित्र म्हणूनही त्यांची विशेष ओळख आहे. माजी मुख्यमंत्री व माजी लोकसभा अध्यक्ष डॉ. मनोहर जोशी यांच्या प्रसिद्धी माध्यमाशी संबंधित जबाबदारी त्यांनी प्रभावीपणे सांभाळली होती. पत्रकारिता आणि सामाजिक क्षेत्राशी त्यांचा सातत्याने जवळचा संबंध राहिला आहे.

समाजातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी तसेच गरजू व्यक्तींना मदत करण्यासाठी लाडे यांचे सामाजिक कार्य सुरू असते. त्यांच्या नियुक्तीमुळे समाजाच्या प्रश्नांना अधिक प्रभावीपणे वाचा फोडली जाईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

सूर्यकांत लाडे यांच्या नियुक्तीबद्दल सामाजिक, राजकीय, पत्रकारिता आणि विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्या पुढील सामाजिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत.



शारदा विद्या मंदिरात ८०वा स्वातंत्र्य दिन उत्साहात साजरा करण्यात आला यावेळी मोफत फिजिओथेरपी शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला यावेळी सुवश सामाजिक व शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष रमेश संकपाळ सर, सचिव अंकुश संकपाळ, संचालिका दीपाली संकपाळ, उपाध्यक्ष आनंदा संकपाळ राजेश देसाई, किसन शिंदे, संजय मोरे, नितीन हिंगे, नवनाथ चिकणे, महाबळेश्वर तालुका प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुरेश शिंदे, उपाध्यक्ष राजेंद्र मोरे, विष्णु शिंदे सर, पांडुरंग संकपाळ, लक्ष्मण दादा कदम,डॉ. स्नेहा संकपाळ, डॉ. प्रशांत मोरे, संपादक भीमराव धूळप आदी मान्यवर उपस्थित होते.

## स्वातंत्र्यदिनानिमित्त साक्षरता शपथ व व्यसनमुक्ती प्रतिज्ञा; तिरंगा रॅलीने सांगता

**चेंबूर :** लोकमान्य शिक्षण संस्था संचलित श्री नारायणराव आचार्य विद्यानिकेतन, चेंबूर-७४ येथे स्वातंत्र्यदिनानिमित्त विविध उपक्रम उत्साहात पार पडले. महाराष्ट्र राज्य क्रीडा व शिक्षण मंत्रालयाच्या परिपत्रकानुसार विद्यार्थ्यांना 'साक्षरता शपथ', तर महाराष्ट्र राज्य पोलीस खात्याच्या परिपत्रकानुसार 'व्यसनमुक्त भारत' प्रतिज्ञा देण्यात आली.

कार्यक्रमाच्या सांगतेनंतर शाळेच्या परिसरातून भव्य तिरंगा रॅली काढण्यात आली. रॅलीमध्ये विद्यार्थ्यांनी देशभक्तीपर गीते सादर करत भारतमाता आणि राष्ट्रभक्तीच्या घोषणा दिल्या. या रॅलीत लोकमान्य शिक्षण संस्थेचे सचिव माणिक पाटील, विश्वस्त हरिश्चंद्र गवस,



मुख्याध्यापक अमोघसिद्ध पाटील तसेच शाळेचे माजी विद्यार्थी व माजी सैनिक, सध्या मुंबई पोलीस दलात कार्यरत असलेले बाबासाहेब ठोंबरे उपस्थित होते.

शाळेतील सुमारे २०० विद्यार्थी, १४ शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले. रॅलीला पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

Printed and published by Bhimrao Hindurao Dhulap, Printed at Plaskot Industries, 23, Municipal Indl. Estate, K. K. Marg, Satrasta, Mumbai -400 011 and published at C/66, Mukuda Nagar, A-Ward, Laxmi Mandir, Dharavi, Mumbai - 400 017. Editor : Bhimrao Hindurao Dhulap, Mob. 9221117684
Any litigation against the content will be entertained under the jurisdiction of Mumbai only.

हे साप्ताहिक प्रकाशक, मुद्रक, मालक श्री. भिमराव हिंदुराव धुळप यांनी प्लासकोट इंडस्ट्रीज, २३, म्युनिसिपल इंडस्ट्रीयल इस्टेट, के. के. मार्ग, सातरस्ता, मुंबई -४०० ०११ येथून छापून सी/६६ मुकुंदनगर, ए/ वॉर्ड, लक्ष्मी मंदिर, धारावी, मुंबई - ४०० ०१७ येथून प्रकाशित केले. संपादक : भिमराव हिंदुराव धुळप. मो. ९२२१११७६८४
(प्रकाशित बातम्या / लेखांशी सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद मुंबई न्यायकक्षेत)